CR1984022107

घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यासाठी सर्व औपचारिक बाबी पूर्ण करणा-या शासकीय कर्मचा-यांना अग्रक्रम तत्वावर घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक एचबीए १०८३/सीआर-७६३/जीईएन-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ फेब्रुवारी १९८४.

<u>प रि प त्र क</u>

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक एचबीए-१०६३/१२७४/५१६/सात, दिनांक ४ जानेवारी १९६९ च्या परिच्छेद ४ नुसार शासकीय कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिमे काटेकोरपणे त्या त्या प्रतिक्षासूचीवरील त्यांच्या क्रमानुसार मंजूर केली जातात. यामुळे काही वेळा हा अग्रिम निधी प्रत्यर्पित करावा लागला आहे असे निदर्शनास आले आहे. याचे कारण असे की, प्रतिक्षा-सूचीवरील ज्येष्ठ कर्मचारी अग्रिम मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करु शकत नाहीत आणि ज्या प्रयोजनासाठी अग्रिम मंजूर करावयाचा त्या प्रयोजनासाठी तो अग्रिम उपयोगात आणु शकत नाहीत आणि म्हणून त्यांना अग्रिम मंजूर करणे शक्य होत नाही. दुस-या बाजूस, जे कर्मचारी अग्रिम मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करु शकतात आणि अग्रिम मंजूर करण्यास सर्वतोपरी पात्र आहेत अशा कर्मचा-यांना, ते प्रतिक्षासूचीवर कनिष्ठ आहेत म्हणून अग्रिम मंजूर करता येत नाही आणि म्हणून त्यांना वर्षानुवर्षे वाट पहावी लागते अथवा अन्य पर्यायी व्यवस्था करावी लागते. याचा परिणाम असा होतो की, विभागांना मंजूर झालेला निधी पूर्णपणे उपयोगात आणला जात नाही आणि प्रतिक्षासूची वाढतच जाते.

२. म्हणून शासन असा निदेश देत आहे की, अग्रिम मंजूर करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षासूची उपरोक्त आदेशानुसार ठेवाव्यात व त्यांचे क्रमानुसार पालन केले जावे. तथापि प्रतिक्षासूचीवर कनिष्ठ असलेल्या कर्मचा-यांनी जर अग्रिम मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी पूर्ण केलेल्या असतील तर त्यांना अग्रिम मंजूर करण्यात यावे. मात्र प्रतिक्षासूचीवरील ज्येष्ठ कर्मचारी अग्रिम मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी पूर्ण करु शकत नसतील आणि त्यामुळे अग्रिम निधी प्रत्यर्पित करावा लागत असेल तरच हा मार्ग अनुसरावा. अशा वेळी ज्येष्ठ कर्मचा-यांचे नाव प्रतिक्षासूचीवर त्यांच्या क्रमामध्ये कोणताही बदल न करता चालू ठेवले पाहिजे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजकुमारी मुभेजा,
कार्यासन अधिकारी,
वित्त विभाग.

प्रति

(१) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (१६० प्रती),
(२) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (८० प्रती),

शामनु··रोटा–वित्त–एच–१०४७(९,०००+५-२-८४)-१